# मुंबई विद्यापीठ

## सामान्य प्रशासन विभाग

**No. GAD/ICM/2016-17/322**

**परिपत्रक :-**

विद्यापीठातील सर्व विभागांचे संचालक / विभाग प्रमुख, सर ज. जी. वास्तुशास्त्र महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य, मुंबई विद्यापीठ ग्रंथालयाचे प्रभारी ग्रंथपाल, स्थानापन्न परिक्षा नियंत्रक, वित्त व लेखा अधिकारी, सर्व उपकुलसचिव, नियंत्रक, मुद्रण व लेखन सामुग्री, विद्यापीठ अभियंता, सर्व सहायक कुलसचिव आणि कुलसचिवांच्या कार्यालियातील सर्व विभागांचे / कक्षांचे प्रमुख तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना कळविण्यात येते की, कार्यालियातील थेट व अंतर्गत दूरध्वनी ("0" Dial) हे सतत व्यस्त असल्याने माहितीबाबत बाहेरुन दूरध्वनी करणा-या विद्यार्थी तसेच अभ्यागतांची सदर बाबत फारच गैरसोय होत आहे असे निदर्शनास आले आहे.

या अनुषंगाने असे कळविण्यात येते की, थेट व अंतर्गत दूरध्वनी ("0" Dial) वापरासंबंधात खाली नमूद केलेल्या नियमांचे काटेकोरपणे पालन करावे.

१) थेट व अंतर्गत ("0" Dial) दूरध्वनी चा वापर फक्त कार्यालयीन कामकाजासाठीच करण्यात यावा.

२) थेट व अंतर्गत दूरध्वनी फार काळ व्यस्त ठेऊ नये.

३) सर्व विभाग/कक्षांनी त्यांच्या अखत्यारित येणा-या विभागाची अद्ययावत माहिती तसेच विद्यार्थ्यांच्या संबंधित सर्व परिपत्रके स्वागतिका तसेच दूरध्वनीचालीकांना परस्पर अग्रेषित करावीत जेणेकरुन सदर माहिती विद्यार्थी तसेच अभ्यागतांना वेळीच देणे सोईचे होईल.

मुंबई-४०० ०३२
दि. १४ जुलै, २०१६

कुलसचिव